**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने-अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना संनियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
शासन परिपत्रक क्रमांक मग्रारो-२०१२/प्र.क्र. ३०/रोहयो-१
दिनांक १७ मे, २०१२

## परिपत्रक

राज्यात सन २००६ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना लागू केल्यानंतर आजतागायत या योजनेअतंर्गत सुरु असलेल्या २.५ लक्ष कामांपैकी केवळ इतकीच कामे पुर्ण झालेली आहेत. म्हणजेच, केवळ १.५ % कामे पुर्ण झालेली आहेत. केंद्र शासनाने याची गंभीर दखल घेतली असून, महाराष्ट्राने लवकरात लवकर अपुर्ण कामांचे प्रमाण कमी करावे असे निदेश दिले आहेत. तसेच दिनांक २३ एप्रिल, २०१२ रोजी यशदा, पुणे येथे मा.मुख्य सचिव यांनी घेतलेल्या बैठकित सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा यांच्या निर्दशनास ही बाब आणलेली आहे.

२. मोठया प्रमाणात कामे अपुर्ण असण्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत :-
अ) काम पुर्ण होऊनही संबंधित अभियंत्यांनी काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र न देणे
ब) काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र प्राप्त होऊनही त्याची MIS वर नोंद न घेणे.

३. उपरोक्त, अपुर्ण कामांपैकी ८०% कामे ग्रामपंचायतीच्या अखत्यारितील आहेत. तेव्हा पंचायत समिती/जिल्हा परिषदेच्या तांत्रिक अधिका-यांची यात महत्वाची भूमिका असून त्यांनी सदरहू कामे पुर्ण करणे, व पुर्ण झालेल्या कामांना पुर्णत्वाचा दाखला देणे अत्यावश्यक आहे

४. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्या अखत्यारित कार्यकारी अभियंता (बांधकामे), कार्यकारी अभियंता (लघु पाटबंधारे) तसेच कृषि विभाग येत असल्याने ग्रामपंचायत स्तरावरील अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, यांची संनियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

५. .हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संगणक संकेतांक २०१२०५१८१७०५६४४५४४००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(सुधीर ठाकरे)**
**प्रधान सचिव (ग्रामविकास विभाग)**

**(व्हि. गिरीराज)**
**प्रधान सचिव (रोहयो)**

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष (महाऑनलाईन वेबसाईटवर वितरण करण्यासाठी ),ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर
कृषी आयुक्त, पुणे
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, ( लेखापरीक्षा) मुंबई / नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे
संचालक, मृदसंधारण व्यवस्थापन, पुणे
संचालक, फलोत्पादन, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
महासंचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. (प्रसिध्दी करीता),
विभागीय कृषि सहसंचालक,ठाणे,पुणे,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद, अमरावती,नागपूर, लातूर.
सर्व सहसंचालक,सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे/कोंकण वृत्त ठाणे.
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग व जलसंधरण विभाग, निवडनस्ती / सारग्रंथ रोहयो-१

G:/2012CR.30.lwp